# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
ता.जि.ठाणे - ४०११०१ दुरध्वनी क्र. २८१८११८२, २८१९२८२८.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## // जाहीर सूचना //

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व नागरिकांना या जाहीर सुचनेव्दारे कळविण्यात येते कि, मा. राज्य निवडणुक आयोगाच्या क्र.रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.४१/का-५ दि. १४/१०/२०२५ व ०४/११/२०२५ रोजीच्या सुधारीत आदेशानुसार दि. ०१/०७/२०२५ रोजी अस्तित्वात असलेल्या विधानसभेची मतदार यादी ग्राह्य धरून मिरा भाईंदर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक-२०२५ करीता दि. २०/११/२०२५ रोजी प्रभाग निहाय प्रारूप मतदार यादी तयार करण्यात आली आहे.

मा. राज्य निवडणूक आयोग यांचेकडील दि. १६/०७/२५, २९/१०/२०२५ रोजीच्या पत्रान्वये एकाच व्यक्तीच्या नावांची अनेक नोंद असल्यास, अशा संभाव्य दुबार नोंदीची यादी महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे व त्यांना ते कोणत्या प्रभागात मतदान करणार आहेत याबाबतचा विहीत नमुना अर्ज (परिशिष्ट-१) देणे बाबत आवाहन करण्याचे निर्देश प्राप्त आहेत.

त्याअनुषंगाने, महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर दुबार नावाच्या मतदारांची यादी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयसह सर्व प्रभाग कार्यालय येथे मतदार सहाय्यता केंद्र (Help Desk) ची स्थापना करण्यात आले आहेत.

तरी, मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील सर्व मतदारांना विनंती करण्यात येत आहे की, सदर मतदार सहाय्यता केंद्र येथे मतदारांनी भेट देऊन आपल्या दुबार नावाची नोंदीची माहिती घ्यावी. व आपल्या दुबार नावाची नोंद असल्यास, आपण कोणत्या वॉर्ड मध्ये मतदान करणार आहात त्याची माहिती परिशिष्ट-१ मध्ये भरुन दि. २२/१२/२०२५ पर्यंत द्यावी.

**(राधाबिनोद अ. शर्मा,** भा.प्र.से.)
**आयुक्त तथा प्रशासक**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

## परिशिष्ट-एक

प्रति,
मतदार यादी तयार करण्यासाठी प्राधिकृत अधिकारी,
----------------- जिल्हा परिषद निवडणूक विभाग / पंचायत समिती गण
----------------- महानगरपालिका प्रभाग
----------------- नगरपरिषद प्रभाग/नगरपंचायत प्रभाग
-----------------ग्रामपंचायत प्रभाग

मी, ------------------------------ ----------राहणार ---------------------------
----------------- याद्वारे कळवितो / कळविते की, माझे नाव उपरोक्त नमूद स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मतदार यादीत खालील प्रभागात /जिल्हा परिषद निवडणूक विभागात / पंचायत समिती गणात समाविष्ट करण्यात आले आहे.

१.

२.

३.

४.

उपरोक्त नमूद स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत मी ------------- प्रभागात / जिल्हा परिषद निवडणूक विभागात/ पंचायत समिती गणातील मतदान केंद्र क्र.------वर मतदान करू इच्छितो. तरी मला यानुसार मतदान करण्याची परवानगी देण्यात यावी. मला नेमून दिलेल्या मतदान केंद्राशिवाय मी इतर कोणत्याही मतदान केंद्रावर मतदान करणार नाही.

उपरोक्त नमूद बाबीचा माझ्याकडून भंग झाल्यास संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अस्तित्वात असलेल्या निवडणूकविषयक अधिनियम / नियमातील तरतुदीनुसार शिक्षेस मी पात्र असेल, याची मला पूर्ण जाणीव आहे.

दिनांक : मतदाराची स्वाक्षरी

ठिकाण

# परिशिष्ट-दोन

## मतदाराकडून घ्यावयाचे हमीपत्र (मतदानाच्या दिवशी)

मी, ________________________________,

या द्वारे हमी देतो/देते की, माझे नाव ------------ या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या -------(प्रभागाचे नाव किंवा क्रमांक / जिल्हा परिषद निवडणूक विभाग /पंचायत समिती गण) या प्रभागातील/ जिल्हा परिषद निवडणूक विभागातील/ पंचायत समिती गणातील मतदार यादीत असून, मी दिनांक ------------ रोजी मतदान असलेल्या ---------- या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सार्वत्रिक/पोटनिवडणुकीत मतदान केंद्र क्रमांक ------------- या मतदान केंद्रावरच मतदान करणार आहे.

मी अशीही हमी देतो/देते की, मी दिनांक ----------- रोजी मतदान असलेल्या ------------- या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सार्वत्रिक / पोटनिवडणुकीकरिता वापरण्यात येणाऱ्या मतदार यादीत कोणत्याही पद्धतीने माझ्या नावाची एक किंवा अनेक ठिकाणी जरी दुबार पध्दतीने नोंद झाली असली तरीही वरील परिच्छेदात नमूद केलेल्या मतदान केंद्राशिवाय इतर कोणत्याही मतदान केंद्रावर मी मतदान केले नाही व करणार नाही.

मी, हमी देतो/देते की, उपरोक्त परिच्छेदामधील नमूद बाबीचा माझ्याकडून भंग झाल्यास संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अस्तित्वात असलेल्या निवडणूकविषयक अधिनियम / नियमातील तरतुदीनुसार शिक्षेस पात्र असेल, याची मला पूर्ण जाणीव आहे.

दिनांक :

(स्वाक्षरी)

ठिकाण :

(मतदाराचे नाव)